Blue Ink Journal of Multidisciplinary Research
An Online Peer-Reviewed Journal
ISSN (Online): 3107-8516
Vol: 02 No. Issue I
(January - March) (2026)

# स्वातंत्र्यपूर्व सातारा परिसराच्या आर्थिक प्रगतीत योगदान देणाऱ्या व्यक्तींचा अभ्यास

**AUTHOR:**
**डॉ. धनाजी बाबुराव मासाळ**
*इतिहास विभाग प्रमुख*
*छत्रपती शिवाजी कोलेज, सातारा*

**प्रस्तावना**

सातारा आणि परिसरामध्ये अनेक व्यक्तींनी आर्थिक विकासात महत्वाची भूमिका बजावली. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये ब्रिटीश कालखंडात बदलत्या परिस्थितीत औद्योगिकरणाला प्रारंभ होत असताना लहान-मोठ्या उदोगांची सुरुवात केली. या व्यक्तींनी केवळ उद्योगधंद्यांची स्थापना केली नाही, तर स्थानिक समाजरचनेत आर्थिक परिवर्तन घडवून आणले. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी शिक्षण, संस्कृती आणि प्रशासनाच्या माध्यमातून आर्थिक घडामोडींना चालना दिली. वासुदेव गणेश चिरमुले यांनी उद्योग, विमा आणि व्यापार क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. धनजीशा कूपर यांनी यंत्रसामग्री व अभियांत्रिकी उद्योग सुरू करून औद्योगिकीकरणाला नवी दिशा दिली. याचप्रमाणे विश्वनाथ नारायण चिपळूणकर यांनी तंबाखू उद्योगात उल्लेखनीय यश संपादन केले, तर मो. ना. आगाशे यांनी आयुर्वेदीय औषधनिर्मिती क्षेत्रात साताऱ्याचे नाव देशभर पोहोचविले. आधुनिक औद्योगिक युगात डॉ. निळकंठराव कल्याणी यांनी अभियांत्रिकी व उत्पादन क्षेत्रात मोठे योगदान देऊन साताऱ्याच्या औद्योगिक विकासाला जागतिक स्तरावर ओळख मिळवून दिली. या सर्व व्यक्तींच्या कार्याचा अभ्यास केल्यास साताऱ्याच्या आर्थिक इतिहासातील परिवर्तनाची दिशा स्पष्ट होते. त्यांनी उभारलेले उद्योग, निर्माण केलेल्या संधी आणि दिलेले रोजगार यांमुळे स्थानिक अर्थव्यवस्था सक्षम झाली. या शोधनिबंधात त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक व उपयुक्त ठरते.

**छत्रपती प्रतापसिंह महाराज**

साताराचे राजे शाहू महाराज यांचे १८१० साली निधन झाल्यानंतर त्यांचा मुलगा प्रतापसिंह उत्तराधिकारी म्हणून विराजमान झाला. त्यांनी त्यांच्या काळात अविस्मरणीय कामगिरी केली. त्यांच्या कार्यकाळात महत्वपूर्ण राजकीय घडामोडी घडून आल्या. इंग्रजांनी १८१८ साली पेशवाईची शेवट केला. सातारा संस्थानचा राजा म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराज यांची नेमणूक करण्यात आली. १८३९ पर्यंत त्यांनी राज्य केले. आपल्या कार्यकाळात साताऱ्याच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली. प्रतापसिंह महाराजांचे साताऱ्यातील मुख्य योगदान खालीलप्रमाणे आहे.

सातारा-मेढा-महाबळेश्वर रस्ता बांधून जोडणी सुधारली. राजवाडा ते पोवई नाका असा 'राजपथ' (दोन पदरी रस्ता) तयार केला, जो शहराच्या नियोजित विकासाचा भाग होता. शिवाय सातारा शहरातील पेठांची निर्मिती केली. सातारा शहरामध्ये पहिला छापखाना सुरु करण्यासाठी प्रोत्साहन दिले. जुन्या राजवाड्यातील रंगमहाल जळाल्यानंतर त्यांनी स्वतःच्या निवासासाठी जलमंदिर पॅलेस बांधला. त्याचबरोबर शहरवासीयांच्या सोयीसाठी व शहराच्या वाढीसाठी पाणीपुरवठा आवश्यक असल्याने येवतेश्वर डोंगरावरून खापरी नळीद्वारे सातारा शहराला पाणीपुरवठा करणारी यंत्रणा निर्माण केली. त्यामुळे शहराच्या नागरीकरणास चालना दिली. त्यामुळे शहराची वाढ झाली आणि व्यापार व वसाहती वाढल्या.

वाढत्या लोकसंख्येबरोबर पायाभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे हे ओळखून त्यांनी शहराच्या शैक्षणिक विकासाला चालना दिली. त्यांनी सातारा शहरात छापखाना सुरू केला आणि मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या.महाबळेश्वरला थंड हवेचे ठिकाण (Hill Station) म्हणून विकसित केले. त्यामुळे अनेक ब्रिटीश अधिकारी व श्रीमंत लोक यांचा महाबळेश्वर व सतर्याशी संपर्क वाढला. त्यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळाली. त्यांनी आपले खाजगी वाचनालय सुरु केले होते. परंतु शहरातील सर्वांच्या हितासाठी त्याला सार्वजनिक स्वरूप दिले. पुढे १८५१ च्या सुमारास ते सार्वजनिक झाले. सध्या हे ग्रंथालय नगर वाचनालय म्हणून ओळखले जाते. त्यांनी लोकांच्या शैक्षणिक आणि ज्ञानाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध करून दिली.[१] सन १८२३ मध्ये त्यांना रॉयल सोसायटी ऑफ लंडन तर्फे सम्मानित करण्यात आले. आधुनिक कालखंडाच्या

सुरुवातीला ब्रिटीश प्रभावाखाली छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा शहराच्या विकासाला आधुनिक दृष्टीकोनातून सुरुवात केली होती. त्यामुळे पुढे शहराच्या विकासाला गती प्राप्त झाली.

**वासुदेव गणेश तथा अण्णासाहेब चिरमुले**

वासुदेव गणेश तथा अण्णासाहेब चिरमुले यांचा जन्म ४ जून १८६४ रोजी सातारा येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण साताऱ्यात झाले. त्यांचा मुळात असलेला मितभाषी स्वभाव, त्यांना घरच्या आर्थिक स्थितीची जाणीव होऊ लागल्यावर गंभीर होत गेला. १८८१ मध्ये अण्णा मॅट्रिकच्या परीक्षेत पास झाले. ते कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात शिकण्यास गेले. त्यानंतर त्यांनी एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई येथे प्रवेश घेतला. त्यांचे विषय इतिहास व अर्थशास्त्र हे होते. अण्णासाहेब १८८४ साली बी ए झाले. त्यांनी एल. एल. बी. चा अभ्यास व तात्पुरती शिक्षकी नोकरी सुरू केली. त्यांनी मुंबईत काही सहकाऱ्यांबरोबर 'दि मराठा स्कूल' या नावाची एक शाळाही काढली. तेथून पुढे ते जमखंडी येथे शिक्षकाची नोकरी करण्यास गेले. १८९० साली अण्णासाहेब एल एल बी झाले. अण्णासाहेबांना न्यायाधीश म्हणून मुधोळ संस्थानात नोकरी मिळाली. न्यायाधीश या पदाचा राजीनामा देवून १८९४ साली साताऱ्यात वकिलीस सुरुवात केली. स्वदेशीचा विचार पुढे आल्यावर, अण्णासाहेब चिरमुले व त्यांचे काही सहकारी यांनी मिळून चार हजार रुपयांच्या भांडवलावर १९०६ सालच्या पाडव्याला स्वदेशी कापड विकणारे दुकान, एक लिमिटेड कंपनी स्थापून सुरू केले.

सहकार चळवळीने आर्थिक आणि सर्वांगीण विकास साधता येईल यावर त्यांचा विश्वास होता. अण्णासाहेबांनी साताऱ्यात सहकारी मंडळे स्थापन करण्यात विशेष मदत केली. रजिस्ट्रारनी अण्णासाहेबांना सातारा जिल्ह्यात सहकारी मंडळांचे सन्माननीय ऑर्गनायझर म्हणून नेमले. त्यांना शेतकी असोसिएशनचेही सन्माननीय चिटणीस नेमण्यात आले. त्यांच्या विषयाचे सखोल ज्ञान मिळवणे, निष्कलंक जीवन, निस्वार्थी वृत्ती, शांत व अबोल स्वभाव, विचारी कृती, निर्लोभीपणा या गुणांमुळे, साताऱ्यात आर्थिक क्षेत्रात नवीन काही करायचे असेल तर त्याचे पुढारीपण आपोआप त्यांच्याकडे येऊ लागले. अण्णासाहेबांनी पाच आर्थिक संस्था लिमिटेड स्वरूपात काढून नावारूपाला आणल्या, त्या अशा – १. दि वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कं. लि., २. दि सातारा स्वदेशी कमर्शियल बँक लि., 3. दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., ४. दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी ॲण्ड एक्झिक्युटर कं. लि., ५. विमा मुद्रक आणि प्रकाशक लि.

**दि वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कंपनी**

अण्णासाहेबांनी साताऱ्यातील विविध सहकारी व विद्वान वकिल यांच्या मदतीने प्रॉस्पेक्ट्स, विम्याच्या विविध योजना- त्यांचे दर, सुरुवातीच्या खर्चाचा अंदाज घेणे, कचेरीच्या कामकाजाचे फॉर्म, घटना बनवणे, अंतर्गत कामाचे नियम बनवणे या सर्व गोष्टी पूर्ण करून घेतल्या. १३ ऑगस्ट १९१३ रोजी रोजी दि वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कंपनी या नावाने कंपनी मुंबईस रजिस्टर झाली.[२] या संदर्भात अण्णासाहेब चिरमुले यांचे योदन म्हणजे विमा हप्त्यांचा पैसा भारत देशातच राहील आणि महाराष्ट्रातील पहिली विमा कंपनी सातारकरांनी काढली. अण्णासाहेबांनी त्यांच्या मृत्युपूर्वी पाच वर्षे 'दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झिक्युटर कंपनी लि.'ची स्थापना केली. तसेच, मृत्युपूर्वी तीन वर्षे अगोदर 'विमा मुद्रक आणि प्रकाशक लि.'ची स्थापना केली. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'अण्णासाहेब चिरमुले पुरस्कार' देखील दिला जातो.[३] २९ ऑगस्ट १९५१ रोजी त्यांचे निधन झाले.

**लक्ष्मणराव किर्लोस्कर**

लक्ष्मणराव काशीनाथ किर्लोस्कर यांचा जन्म २० जून १८६९ रोजी झाला. हे किर्लोस्कर समूह आणि भारतातील पहिल्या औद्योगिक वसाहतींपैकी एक असलेल्या किर्लोस्करवाडीचे संस्थापक होते. शेतकऱ्यांच्या व शेतीच्या विकासासाठी शेतकऱ्यांना उपयुक्त साधने निर्माण करणे आवश्यक वाटले व बेळगाव येथे कारखाना सुरु केला. परंतु जानेवारी १९१० मध्ये, बेळगाव नगरपालिकेने लक्ष्मणरावांना नवीन उपनगरासाठी जागा मोकळी करण्याकरिता बेळगाव खाली करण्याचा आदेश दिला. तेव्हा औंधच्या राजाने मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे, त्यांनी लक्ष्मणरावांना बिनव्याजी दहा हजार रुपयांचे कर्ज आणि कुंडल रोड नावाच्या एका प्रसिद्ध रेल्वे स्थानकाजवळची ३२ एकर पडीक जमीन देऊ केली. हीच जागा किर्लोस्करवाडी आणि किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेडचा कारखाना बनली.

त्यांनी २५ कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणले आणि आपल्या स्वप्नातील गावात रूपांतर करण्यात यश मिळवले. माणसांची पारख करण्याची त्यांची क्षमता आणि वरवरच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पात्रतेकडे दुर्लक्ष करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे, त्यांना सामान्य दिसणाऱ्या लोकांमध्येही सुप्त क्षमता जागृत करण्याची विलक्षण शक्ती प्राप्त झाली होती. त्यांचे ज्येष्ठ पुत्र शांतनुराव किर्लोस्कर, समूहाच्या कार्याचा एक नवीन पैलू – डिझेल इंजिन – सुरू करण्यासाठी पुण्यात आले. त्यांनी युकेच्या असोसिएटेड ब्रिटिश ऑइल इंजिन्स एक्सपोर्ट लिमिटेडसोबत सहकार्याच्या करारावर स्वाक्षरी केल्यानंतर लगेचच किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लिमिटेड (KOEL) साठी जागा मिळवली. एका भारतीय आणि एका परदेशी कंपनीमधील अशा प्रकारचे पहिलेच सहकार्य होते, ज्याने पूर्व आणि पश्चिम यांच्यातील तांत्रिक दरी सांधली. या कारखान्याने भारताला तिचे पहिले व्हर्टिकल हाय-स्पीड इंजिन दिले; आणि लक्ष्मणरावांचे शेतकऱ्यांसाठी इंजिन बनवण्याचे आणखी एक स्वप्न पूर्ण केले. लक्ष्मणराव किर्लोस्कर हे असे व्यक्तिमत्व होते, ज्यांचा असा विश्वास होता की, क्रांतिकारक औद्योगिक उपकरणांच्या निर्मितीसाठी आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचे आणि वास्तवाचे आकलन असणे अत्यावश्यक आहे. २६ सप्टेंबर १९५६ रोजी त्यांचा मृत्यू झाला.[४] भारत सरकारच्या टपाल विभागाने लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या जयंतीनिमित्त २० जून १९६९ रोजी एक टपाल तिकीट जारी केले.

**धनजीशा कूपर**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमुळे स्वदेशी चळवळीमुळे भारतीय उद्योगांना प्रोत्साहन मिळाले. स्थानिक उत्पादनांचा वापर वाढवण्यावर भर देण्यात आला. या चळवळीचा अप्रत्यक्ष परिणाम कूपर यांच्या उद्योगांवरही झाला. त्यांनी स्थानिक संसाधनांचा वापर करून उत्पादन करण्यावर भर दिला, ज्यामुळे स्वदेशी संकल्पनेला बळ मिळाले. धनजीशा कूपर यांचा जन्म २ जानेवारी १८७८ रोजी एका मध्यमवर्गीय व्यापारी कुटुंबात झाला. त्या काळात महाराष्ट्रातील अनेक व्यापारी कुटुंबे पारंपरिक व्यवसायांमध्ये गुंतलेली होती. व्यापार, सावकारी, धान्य खरेदी-विक्री आणि लघुउद्योग हे त्यांच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत होते. कूपर यांच्या कुटुंबातील संस्कार आणि मूल्यव्यवस्था देखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाची ठरली. कूपर यांच्या प्रारंभीच्या जीवनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची जोखीम घेण्याची तयारी. त्या काळात ग्रामीण भागात उद्योग सुरू करणे हे अत्यंत धाडसी पाऊल होते. भांडवलाची कमतरता, तांत्रिक अडचणी आणि बाजारपेठेची अनिश्चितता या सर्व अडचणी असूनही त्यांनी उद्योग उभारण्याचा निर्णय घेतला. ही जोखीम घेण्याची वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक महत्त्वाची वैशिष्ट्य होती.[५]

सातारा रोड येथील उद्योगांची स्थापना आणि प्रारंभीची औद्योगिक वाटचाल

भारतीय औद्योगिक इतिहासात ग्रामीण भागात उद्योग उभारण्याची प्रक्रिया ही अत्यंत आव्हानात्मक आणि धाडसी मानली जाते. त्यांनी सातारा परिसरातील आर्थिक मर्यादा, बेरोजगारी आणि संसाधनांचा अपुरा वापर यांचा बारकाईने अभ्यास केला होता. या सर्व घटकांचा विचार करून त्यांनी उद्योग स्थापनेचा निर्णय घेतला. त्या काळात सातारा रोड हा एक महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग बनत होता, विशेषतः रेल्वेच्या आगमनानंतर या भागाचे आर्थिक महत्त्व वाढले. त्यांनी उपलब्ध कच्चा माल, स्थानिक कौशल्ये आणि बाजारपेठेची गरज यांचा समन्वय साधून उद्योगांची रचना केली. या दृष्टिकोनामुळे त्यांच्या उद्योगांना स्थैर्य प्राप्त झाले आणि उत्पादनाची सातत्यता टिकून राहिली. कूपर यांच्या औद्योगिक उपक्रमांमध्ये व्यवस्थापन पद्धतीचा विशेष उल्लेख करावा लागतो. त्यांनी आधुनिक व्यवस्थापन तत्त्वांचा अवलंब केला. उत्पादन नियोजन, कामगारांचे व्यवस्थापन, खर्च नियंत्रण आणि बाजारपेठेचे विश्लेषण या सर्व बाबींमध्ये त्यांनी एक शिस्तबद्ध दृष्टिकोन ठेवला. त्यांच्या या व्यवस्थापन कौशल्यामुळे त्यांच्या उद्योगांनी अल्पावधीतच प्रगती केली.[६]

ग्रामीण औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत एखाद्या उद्योगसमूहाचा स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम हा बहुआयामी स्वरूपाचा असतो. केवळ उत्पादन आणि नफ्यापुरता मर्यादित न राहता, तो रोजगार, व्यापार, पायाभूत सुविधा, सामाजिक रचना आणि सांस्कृतिक परिवर्तन यांवरही परिणाम करतो. या दृष्टीने धनजीशा कूपर यांनी उभारलेला कूपर उद्योग समूह हा सातारा परिसराच्या आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या बदलामुळे स्थानिक अर्थव्यवस्था अधिक विविध आणि स्थिर झाली. तथापि, या औद्योगिक विकासासोबत काही आव्हानेही होती. पर्यावरणीय परिणाम, कामगारांच्या समस्या आणि बाजारपेठेतील स्पर्धा या मुद्द्यांवरही लक्ष देणे आवश्यक होते. कूपर उद्योग समूहाने या आव्हानांना सामोरे जाण्याचा प्रयत्न केला, परंतु काही समस्या अपरिहार्य होत्या.[७] धनजीशा कूपर यांनी उभारलेला कूपर उद्योग समूह हा सातारा परिसराच्या आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा घटक ठरला.

**गुरुनाथ प्रभाकर ओगले**

भारतातील औद्योगिकीकरणास हातभार लावणारे प्रसिद्ध कारखानदार व ओगलेवाडी येथील ‘ओगले ग्लास वर्क्स’चे संस्थापक श्री. गुरुनाथ प्रभाकर ओगले यांचा जन्म बावडा (कोल्हापूर) येथे १८८७ साली झाला. त्यांनी आपले मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण कोल्हापूर येथे पूर्ण केले. त्यानंतर व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट मुंबईमध्ये व्यावसायिक शिक्षण घेतले. या संस्थेतून १९०८ त्यांनी एल्. एम्. ई.चा शिक्षणक्रम पहिल्या क्रमांकाने पूर्ण केला. आपला अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ते बार्शीच्या ‘लक्ष्मी टेक्निकल इन्स्टिट्यूट’ मध्ये काही काळ प्रमुख अध्यापक होते. हिंदुस्थान सरकारने त्यांना काचउत्पादनच्या उच्च शिक्षणार्थ शिष्यवृत्ती देऊन १९२०-२१ मध्ये परदेशात पाठविले. शेफील्ड येथील अभ्यासानंतर ते अमेरिकेस गेले. अमेरिकेतील पिट्सबर्ग विद्यापीठात काचनिर्मितीच्या तंत्राचा अभ्यास करून १९२२ साली ते स्वदेशी परतले. तसेच कंदीलनिर्मितीची यंत्रसामग्री खरेदी करण्याकरिता ते १९२४ मध्ये जर्मनीस गेले. तेथून भारतात परतल्यावर १९२५-२६ पासून प्रसिद्ध प्रभाकर कंदिलांचे उत्पादन त्यांनी सुरू केले. प्रभाकर कंदिलांची निर्मिती ही गुरुनाथांनी सर्वांत महत्त्वाची कामगिरी समजली जाते. प्रभाकर कंदील पुढे लवकरच जगद्‌विख्यात झाला. ते कोईमतूर येथे वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी १६ ऑक्टोबर १९४४ रोजी मरण पावले.[८]

**विश्वनाथ नारायण चिपळूणकर**

सन १९३० मध्ये सातारा येथे त्यांनी जर्दा (तंबाखू प्रक्रिया व उत्पादन) व्यवसायाची स्थापना केली. हा व्यवसाय केवळ आर्थिक उपक्रम नव्हता, तर तो स्थानिक उद्योग, रोजगारनिर्मिती आणि बाजारपेठेच्या विस्ताराशी संबंधित होता. त्यांच्या कार्यामुळे सातारा परिसरातील व्यापार आणि लघुउद्योग क्षेत्राला एक नवे परिमाण मिळाले. २०व्या शतकाच्या प्रारंभी भारतात स्वातंत्र्य चळवळीचे वातावरण तयार होत होते. स्वदेशी, स्वावलंबन आणि राष्ट्रीय जाणीव या मूल्यांचा प्रसार होत होता. या पार्श्वभूमीवर चिपळूणकर यांच्या मनात स्वदेशी उद्योग उभारण्याची प्रेरणा निर्माण झाली. सांस्कृतिकदृष्ट्या पाहता, सातारा परिसरात धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांना मोठे महत्त्व होते. उत्सव, यात्रा आणि धार्मिक विधी यांचा सामाजिक जीवनावर प्रभाव होता. या वातावरणात वाढलेल्या चिपळूणकर यांच्या मनात समाजाबद्दलची बांधिलकी निर्माण झाली.[९] जर्दा उद्योगाची स्थापना ही केवळ आर्थिक गरजांमुळे नव्हे, तर त्या काळातील बाजारपेठेच्या मागणीचे योग्य आकलन करून करण्यात आलेली होती.

ब्रिटिश कालखंडातील आर्थिक परिस्थिती लक्षात घेतल्यास, भारतीय उद्योजकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. करप्रणाली, परवाने आणि बाजारपेठेतील स्पर्धा यांसारख्या घटकांचा प्रभाव होता. तथापि, चिपळूणकर यांनी या अडचणींवर मात करून उद्योग यशस्वीपणे चालवला. त्यांच्या यशामागे त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचा आणि दूरदृष्टीचा मोठा वाटा होता.[१०] सन १९९३ मध्ये साता-याच्या चार जर्दा कारखान्यांची वार्षिक उलाढाल पाच ते सात कोटी रुपये होती. त्यावर्षी त्यात अंदाजे ६०० कामगार होते. कारखान्यांना लागणारा तंबाखू गुजरातमधील भादरन येथून मागविला जातो. स्थानिक मागणीव्यतिरिक्त नाशिक, जळगाव, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांतही येथील जर्ध्याला चांगली मागणी आहे.[११]

**मो. ना. आगाशे**

भारतीय वैद्यकशास्त्राच्या परंपरेत आयुर्वेदाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हजारो वर्षांची परंपरा, औषधी वनस्पतींचा अभ्यास, आणि मानवी आरोग्याविषयीची समग्र दृष्टी या सर्व घटकांमुळे आयुर्वेदाने भारतीय समाजात एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ब्रिटिश कालखंडातील आरोग्यव्यवस्थेचा विचार करता, सरकारी धोरणे प्रामुख्याने पाश्चिमात्य वैद्यकशास्त्राच्या प्रसारावर केंद्रित होती. सरकारी रुग्णालये, वैद्यकीय शिक्षण आणि औषधनिर्मिती यामध्ये आयुर्वेदाला फारसे प्रोत्साहन मिळत नव्हते. या पार्श्वभूमीवर आगाशे यांसारख्या व्यक्तींनी आयुर्वेदाचे महत्त्व ओळखून त्याच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न केले.

इ.स. १९१३ साली आयुर्वेदाचे काही प्रेमी व्यक्तींनी सातारा येथे ‘आयुर्वेद प्रसारक मंडळी आणि ‘आर्यांग्ल वैदिक विद्यालय’ या संस्थांची स्थापना केली. या संस्थांचा उद्देश आधुनिक वैद्यकशास्त्राच्या पूरक स्वरूपात आयुर्वेदाचे शिक्षण देणे हा होता. महाराष्ट्र राज्यातील अशा प्रकारची ही कदाचित पहिलीच संस्था होती. इ.स. १९१८ मध्ये साताऱ्यातील आधुनिक वैद्यकशास्त्राचे पहिले पदवीधर डॉ. मो.ना. आगाशे आर्यांग्ल वैदिक विद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झाले. विद्यार्थ्यांना औषधनिर्मितीचे व्यावहारिक प्रशिक्षण मिळावे आणि आयुर्वेदिक वैद्यांना तयार औषधे उपलब्ध व्हावीत, या गरजेची जाणीव होऊन त्यांनी इ.स. १९२६ मध्ये आपल्या निवासस्थानी ‘आयुर्वेद अर्कशाळा’ ही खाजगी संस्था सुरू केली. या कार्यात

त्यांना आयुर्वेदिक औषधनिर्मितीचा अनुभव असलेल्या एस.एन.वैद्य आणि रानडे यांचे सहकार्य लाभले. डॉ. एम. एन. आगाशे हे आधुनिक वैद्यकशास्त्राचे पदवीधर असले तरी त्यांना आयुर्वेद प्रणालीबद्दल विशेष रस होता. व्यवसायाचा विस्तार आणि आर्थिक गरजांमुळे ही संस्था सार्वजनिक लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतरित करण्यात आली आणि प्रशस्त जागेत स्थलांतरित करण्यात आली. आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी, डॉ. व्ही.एल. अगाशे, आर. एन. गोडबोले, अरुण आर. गोडबोले यांसारख्या निस्वार्थी व समर्पित प्रशासकांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एस.एन. वैद्य, रानडे, डी.व्ही.वैद्य, बोडस, जी. ए. वैद्य फडके यांसारख्या अनुभवी सल्लागारांच्या सहकार्याने 'अर्कशाळा ही एक विश्वासार्ह आणि नामांकित आयुर्वेदिक औषधनिर्मिती संस्था म्हणून विकसित झाली. प्राचीन आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये नमूद केलेल्या पद्धती आणि गुणवत्तेच्या निकषांवर ती कधीही तडजोड करत नाही. आज 'अर्कशाळा'च्या महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांमध्ये अनेक शाखा आणि डेपो कार्यरत आहेत. या अर्कशाळेतत्यात आयुर्वेद संशोधनाबरोबर बरीच आयुर्वेदिक औषधे तयार होतात. यात १२० प्रकारची औषधे तयार होतात. सन १९४१ मध्ये अवघी ३४,००० रुपये गुंतवणूक होती. मात्र १९५८ मध्ये त्याची मालमत्ता २,३२,६६७ रुपये होऊन ८४,९०५ रुपयांची औषधे तयार करण्यासाठी ६६ कामगार होते. उत्पादन पद्धती हस्तक्रियेवर आधारित असून यांत्रिकीकरणाचा वापर होत नाही. स्वतःच्या प्रयोगशाळेत अर्कशाळेने संशोधन करून मधुमेहावर मेहारी नामक औषधाचे उत्पादन सुरू केले.[१२]

**डॉ. निळकंठराव कल्याणी**

उद्योगपती डॉ. निळकंठराव कल्याणी यांचा जन्म १९२६ साली व्यापारी कुटुंबात झाला. त्यांचे वडील गूळ, हळद आणि शेंगदाण्याच्या व्यवसायामध्ये होते. त्यामुळे व्यवसायाचे बाळकडू त्यांना घरूनच मिळाले. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या आग्रहामुळे स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात फोर्जिंग व्यवसायामध्ये त्यांनी पदार्पण केले. १९६० च्या सुमारास त्यांनी कल्याणी फोर्जची स्थापना केली. फोर्जिंगच्या व्यवसायाचा विस्तार करतानाच त्यांनी इतर उत्पादन क्षेत्रांमध्येही भक्कम पाय रोवले. फोर्जिंग व्यवसायाची सुरुवात करताना शेतकरी आणि मित्रांकडून २५ लाखांची जमवाजमव करण्यापासून हा व्यवसाय एक हजार कोटी रुपयांच्या उलाढालीकडे नेण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. कायनेटिक इंजिनीअरिंग लिमिटेड,सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेड,कल्याणी इन्स्टिट्यूट ऑफ सायंटिफिक रिसर्च अशा नानाविध संस्था-संघटनांसाठीही त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. महाराष्ट्र सहकारी भू-विकास बँकेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी १२ वर्षे काम पाहिले.[१३] उद्योग क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. फोर्जिंगसोबतच त्यांनी कायनेटिक इंजिनीअरिंग लिमिटेड, सुदर्शन केमिकल्स इंडस्ट्रीज लिमिटेड अशा संस्थांमध्येही महत्त्वाची भूमिका बजावली होती.

**निष्कर्ष**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये विविध व्यक्तींनी सातारा शहर आणि परिसराच्या आर्थिक विकासामध्ये दिलेले योगदान पाहिल्यानंतर खालील निष्कर्ष मांडता येतील.

१. औद्योगिक, व्यापारी आणि शैक्षणिक क्षेत्रात विविध व्यक्तींनी केलेल्या कार्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला गती मिळाली आणि आर्थिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली.

२. छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण आणि नागरी सुविधा निर्माण करून शहराच्या नियोजित विकासाचा पाया घातला, ज्यामुळे व्यापार आणि वसाहती वाढल्या.

३. वासुदेव गणेश चिरमुले यांसारख्या नेत्यांनी सहकारी संस्था, बँका आणि विमा कंपन्या स्थापन करून आर्थिक स्वावलंबनाची भावना विकसित केली.

४. लक्ष्मणराव किर्लोस्कर, धनजीशा कूपर यांसारख्या उद्योजकांनी उद्योग स्थापन करून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आणि स्थानिक अर्थव्यवस्था अधिक स्थिर केली.

५. तंबाखू, काचउद्योग, आयुर्वेदिक औषधनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांमध्ये कार्यरत व्यक्तींनी स्थानिक उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली आणि आर्थिक क्रियाशीलता वाढवली.

६. ब्रिटिश काळातील अडचणी असूनही स्थानिक उद्योजकांनी स्वदेशी तत्त्वांवर आधारित उद्योग उभारले, आधुनिक व्यवस्थापन पद्धती अवलंबल्या आणि साताऱ्याला औद्योगिक ओळख मिळवून दिली.

**संदर्भ:**


१. https://www.satara.gov.in
२. https://thinkmaharashtra.com
३. https://www.google.com/search?q
४. https://kirloskarenrichinglives.com/our-legacy/
५. Chandra Bipan et al., *India's Struggle for Independence*, Penguin, New Delhi, 1989, P. 60–65.
६. Roy Tirthankar, *The Economic History of India 1857–1947*, Oxford University Press, New Delhi, 2000, P. 130–135.
७. Kumar Dharma, ed., *Op. Cit.*, Pp. 230–240.
८. https://vishwakosh.marathi.gov.in/21965/
९. Gadgil D. R., Industrial Evolution of India in Recent Times, Oxford University Press, Bombay, 1950, P. 100–115.
१०. Government of Maharashtra, Satara District Gazetteer, Government Press, Mumbai, 1963, P. 280–300.
११. पाठक अरुणचंद्र (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०१२, पृ. ४१९.
१२. आगाशे रमेश (संपा.), डॉ. मो. ना. आगाशे एक राजस योगी, रमेश आगाशे, सातारा २०२१, पृ. ९- ११६: आगाशे वि. ल. (संपा.), दर्शन: आयुर्वेद प्रसारक मंडळी, सातारा हिरक महोत्सव, दा. द. परांजपे, सातारा, १९७६, पृ. ५-१६.
१३. https://maharashtratimes.com/maharashtra/pune-news/-/articleshow/22037068.cms